महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७० वे | दिनांक : २६/०९/२०२६ | वार : शनिवार


## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यावर सुषमा अंधारेंची खोचक टीका; ‘लाईट कॅमेरा ॲक्शन’ म्हणत निशाणा



**सोलापूर :** शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्यात सातत्याने सुरू असलेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर अंधारे यांनी गोरेंना पुन्हा एकदा खुले आव्हान दिले आहे. यापूर्वी जयकुमार गोरे यांनी केलेल्या बोचऱ्या टीकेला प्रत्युत्तर देताना अंधारे यांनी पत्रकार परिषदेत गोरेंवर दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांची यादीच मांडली होती. आता पुन्हा आक्रमक होत, "एखाद्या केसने लोक गप्प बसतील असे होत नाही, आता थेट तुमच्या मतदारसंघातच भेटूया," असा स्पष्ट इशारा सुषमा अंधारे यांनी दिला आहे. याशिवाय, त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावरूनही जोरदार टीका करत आपला निषेध नोंदवला आहे. सोलापूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, एखादी केस दाखल केली म्हणजे लोक गप्प बसतील, या भ्रमात गोरे यांनी राहू नये. अशा गोष्टींना जर घाबरणाऱ्यांपैकी मी असते ना, तर केव्हाच सत्ताधाऱ्यांच्या रेड कार्पेटवरून चालण्याची तयारी दाखवली असती. पण, मी संघर्षाचा मार्ग स्वीकारला आहे. मी सोलापूरमध्ये आहे आणि पक्षप्रमुखांनी माझी इथली बांधणी बघून, आता तुम्ही ज्या मतदारसंघातून निवडून आला आहात ना, त्याही मतदारसंघात मला काम करायला पाठवलं आहे. त्यामुळे, आता आपण पुन्हा पुन्हा भेटूया, असे आव्हान अंधारे यांनी गोरे यांना दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाहणी दौऱ्यावर टीका करताना सुषमा अंधारे म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दुष्काळ पाहणी केली, त्यांना शेतातील फार काही कळत नाही. विरोधी बाकावर असताना त्यांची भूमिका वेगळी होती, आता त्यांची भूमिका बादळलील आहे. कदाचित उद्या देवेंद्र फडणवीस यांच्या दृष्टीने मुहूर्त असेल पण इतके ही थांबायची गरज काय? असा सवाल करत जीआर काढण्यास शासन उशीर करत असल्याची टीका अंधारे यांनी केली आहे. पुढे सुषमा अंधारे म्हणाल्या, स्पष्ट आहे की दुष्काळ पडलाय, कापसावर लाल्या रोग पडलाय. दहा मिनिटात दौरा होत नसतो. तुमच्या बाजूला असलेला गोडबोल्या जयकुमार गोरेने हे तुम्हाला सांगायला हवे होते, तुमच्याच पक्षाचा कोणीतरी येईल, तुमच्यात बगलेत जाऊन रडण्याचे नाटक करेल, लाईट कॅमेरा ऍक्शन असे होत नसते. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करताना सुषमा अंधारे यांनी बार्शीतील शेतकऱ्याच्या आत्महत्येवर तीव्र दुःख व्यक्त करत, शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी आपल्या लेकरांच्या चेहऱ्याकडे पाहून आत्महत्येचा मार्ग टाळावा, अशी भावनिक साद आपल्या आईच्या कठीण संघर्षाचे उदाहरण देत घातली. याच पार्श्वभूमीवर, राज्यातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आदित्य ठाकरे आज रात्री सोलापुरात मुक्कामी येणार असून, उद्या सकाळी साडेदहा वाजल्यापासून त्यांच्या दक्षिण सोलापूर, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या दोन दिवसीय दौऱ्याला सुरुवात होणार असल्याची माहितीही अंधारे यांनी यावेळी दिली.

## सातारा जिल्हा बँक निवडणुकीत उदयनराजेंची एंट्री; गोरेंना अप्रत्यक्ष टोला



**सातारा :** सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी खासदार उदयनराजे भोसले यांनी शुक्रवारी निवडणूक अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी मोजक्या समर्थकांसह त्यांनी अर्ज दाखल केला. मात्र, आरबीआयच्या नव्या निकषांमुळे सलग दहा वर्षे संचालक असलेल्या व्यक्तींना निवडणूक लढविता येणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याचे सांगितले जात आहे. उदयनराजे सलग दहा वर्षे संचालक असल्याने त्यांच्या उमेदवारीबाबतही उत्सुकता निर्माण झाली आहे. उद्या पौर्णिमा आणि त्यानंतर पितृपंधरवडा सुरू होत असल्याने उदयनराजेंनी पहिल्याच दिवशी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला. अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांनी त्यांना जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबत प्रश्न विचारले. यावेळी मात्र उदयनराजेंचा पारा चढल्याचे पाहायला मिळाले. सातारा जिल्हा बँकेची निवडणूक भारतीय जनता पक्ष मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली लढणार असल्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी यापूर्वी म्हटले होते. त्यासंदर्भात उदयनराजेंना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी आपल्या खास शैलीत प्रत्युत्तर दिले. ‘बँकेच्या निवडणुकीबाबत कुणाशी बोलायचं काय कारण? ह्याच्याशी बोला, त्याच्याशी बोला. सगळं काही पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना विचारून करणार आहात का?’ असा उलट सवाल उदयनराजेंनी केला. त्यांच्या या वक्तव्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. जिल्हा बँकेची निवडणूक सर्वसमावेशक आणि राजकारणविरहित असावी, अशी भूमिका उदयनराजेंनी मांडली. ‘ज्या जिल्ह्यात राजकारणाचा शिरकाव झाला, त्या बँका फिनिश झाल्या,’ असे म्हणत त्यांनी सहकारी बँकांमध्ये राजकारण आणण्याला विरोध केला. उदयनराजे म्हणाले की, कोणत्याही बँकेत राजकारण आले तर त्याचा परिणाम संस्थेच्या कामकाजावर होतो. त्यामुळे ‘राजकीय जोडे बँकेच्या बाहेर ठेवले पाहिजेत,’ अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या हितासाठी स्थापन झालेली संस्था असल्याचे उदयनराजेंनी सांगितले. बँकेने शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे हित जोपासले आहे. त्यामुळेच आज ही बँक भक्कमपणे उभी असल्याचे त्यांनी नमूद केले. बँकेची स्थापना ज्या उद्देशाने झाली, तो उद्देश कोणत्याही परिस्थितीत बाजूला पडता कामा नये. शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या हितासाठी बँक टिकली पाहिजे, अशी भूमिका उदयनराजेंनी यावेळी पुन्हा स्पष्ट केली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६


## पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त श्रीकृष्ण महाविद्यालयात प्रा. डॉ. राजाराम निगडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, तसेच प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. पी.एस.राऊत, प्रा.डॉ.रामकृष्ण कदम,प्रा. डॉ .बालाजी कोनाळे, प्रा. डॉ. आसिया चिश्ती, उपस्थित होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे जीवन कार्याविषयी माहिती देताना प्रा. डॉ. आर. एन. निगडे म्हणाले की एकात्म समाजाची निर्मिती आणि ती संकल्पना साकारण्यासाठी पंडित दीनदयाल यांनी आपल्या वैचारिक मांडणीतून आणि आचरणातून विशेष प्रयत्न केले . ते १९३७ मध्ये कानपूर येथे राष्ट्रीय स्वयंम सेवक संघाचे स्वयंसेवक झाले आणि १९४२ पासून पूर्णवेळ संघाचे प्रचारक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य केले. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी "राष्ट्रधर्म" हे मासिक आणि "पंचजन्य" हे साप्ताहिक असे स्वदेशी कार्य सुरू केले. भारतीय जनसंघाची स्थापना करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांनी जनसंघाचे महासचिव आणि पुढे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. त्यांनी शालांत परीक्षेमध्ये विशेष यश मिळवले होते . कानपूरच्या सनातन धर्म कॉलेजमधून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले आणि ते अजन्म अविवाहित राहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य केले. मानवाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारा एकात्म मानववादाचा सिद्धांत मांडला, या विचारानुसार समाज, राष्ट्र आणि सृष्टी यांच्यात एकात्मता असून मानवी जीवनाकडे शरीर, बुद्धी, मन आणि आत्मा या सर्वांच्या समन्वयातून पाहिले पाहिजे असा आग्रह होता ,कारण अर्थकारण आणि राजकारण हा मानवकेंद्र विचार असावा, जिथे समाजातील शेवटच्या घटकाचा म्हणजेच अंत्योदय विकास साधला जाईल हा या सिद्धांताचा उद्देश होता. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## स्पर्धेतील विजेत्यांना सुनीता पावशेरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण



**कलदेव लिंबाळा (प्रा.नागसेन कांबळे)** : नवतरुण सार्वजनिक गणेश मंडळ, कलदेव निंबाळा यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शहीद भगतसिंग विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भव्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये निबंध लेखन, वक्तृत्व, रांगोळी, संगीत खुर्ची आदी विविध स्पर्धांचा समावेश होता.अशा स्पर्धामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून आपल्याला व्यक्त होण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने नेहमीच अशा विविध स्पर्धांचे सालाबादप्रमाणे आयोजन केले जाते.या स्पर्धेत सहभागी होऊन यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत गटनेत्या सौ. सुनिता देविदास पावशेरे यांच्या वतीने विविध प्रकाराचे शालोपयोगी शैक्षणिक साहित्य देऊन प्रोत्साहनपर बक्षिसांचे वितरण करण्यात आले.विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा,त्यांना मुक्तपणे व्यक्त होता यावे. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा तसेच विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी शिक्षिका मेघा मते, सुनीता पटवारी, सागर कुलकर्णी,सतीश गायकवाड आदी शिक्षकासह गणेश मंडळाचे सुरज पाटील, विघ्नेश घोटमाळे, गोपाळ बिराजदार, गोवर्धन बिराजदार, ईश्वर गोंधळी तसेच विजय पाटील, प्रसाद बोकडे, अभिषेक घंटे, सार्थक सुरवसे, राजू बलसुरे, संकेत सुरवसे, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, स्पर्धक विद्यार्थी, पालक व गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## बीएमसीचा अजय देवगणला दणका; जुहूतील बंगल्याला नोटीस

मुंबई : बॉलिवूड अभिनेता अजय देवगणच्या मुंबईतील जुहू येथील बंगल्याशी संबंधित प्रकरण सध्या चर्चेत आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) जुहूतील देवगण कुटुंबाच्या मालकीच्या बंगल्यात सुरू असलेल्या प्रस्तावित सलून आणि स्पाच्या कामाला स्थगिती देण्याची नोटीस बजावली आहे. संबंधित जागेच्या व्यावसायिक वापरासाठी आवश्यक परवानग्या आणि कागदपत्रांबाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर पालिकेने ही कारवाई केली आहे. अजय देवगणचा जुहूतील एन.एस. रोड क्रमांक ११, प्लॉट क्रमांक एस-१० येथे सुमारे ७,८०२ चौरस फुटांचा बंगला आहे. या मालमत्तेत सलून आणि स्पा सुरू करण्यासाठी काम सुरू असल्याचे समोर आले. मात्र, या जागेचा प्रस्तावित व्यावसायिक वापर करण्यासाठी आवश्यक पालिका परवानगीबाबत कापोल सहकारी गृहनिर्माण संस्थेने आक्षेप घेतला. सोसायटीकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर बीएमसीच्या के-वेस्ट विभागातील इमारती व कारखाने विभागाने प्रकरणाची पाहणी केली. त्यानंतर मालमत्ता मालकांकडे संबंधित कामासाठी आवश्यक कागदपत्रे आणि मंजुऱ्या सादर करण्यास सांगण्यात आले. पालिकेच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित व्यावसायिक वापरासाठी आवश्यक कागदपत्रे आणि परवानग्या सादर करण्यात न आल्याने काम थांबवण्याची नोटीस देण्यात आली. त्यामुळे बंगल्यात सुरू असलेल्या सलून आणि स्पाशी संबंधित कामावर सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र, देवगण कुटुंबीयांकडून संबंधित वापरासाठी आवश्यक परवानग्या आणि मंजुऱ्या मिळवल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे बीएमसीकडे सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांची आणि परवानग्यांची तपासणी या प्रकरणात महत्त्वाची ठरणार आहे. कापोल सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांनी प्रस्तावित व्यावसायिक वापराबाबत चिंता व्यक्त केली आहे. बंगला व्यावसायिक कारणांसाठी वापरला गेल्यास परिसरात बाहेरील नागरिकांची वर्दळ वाढू शकते, तसेच पार्किंग, सुरक्षा आणि आवाजाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. म्हणूनच ही केवळ अजय देवगण यांच्या मालमत्तेची बाब राहिलेली नसून, संबंधित मालमत्तेचा वापर ज्या पद्धतीने केला जाणार आहे, त्यासाठी सोसायटीचे नियम आणि महापालिकेच्या परवानग्या पूर्ण आहेत का, हा मुख्य मुद्दा बनला आहे. दरम्यान, ही मालमत्ता फ्लोरियन ह्युरेल सलून्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला लीव्ह-अँड-लायसन्स कराराद्वारे देण्यात आल्याची माहिती आहे. १० ऑगस्ट रोजी झालेला हा करार ५ वर्षांसाठी असल्याचे सांगण्यात आले आहे. करारानुसार पहिल्या वर्षासाठी दरमहा १६ लाख रुपये भाडे निश्चित करण्यात आले असून, त्यानंतर दरवर्षी भाड्यात वाढ होणार आहे. मात्र, या मालमत्तेचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी आहे का, यावरूनच सध्या वाद निर्माण झाला आहे. बीएमसीच्या नोटीसला उत्तर देण्यासाठी अजय देवगण यांच्या कुटुंबीयांनी ४ आठवड्यांचा वेळ मागितला आहे. संबंधित मालमत्तेच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या आणि कागदपत्रे अधिकाऱ्यांसमोर सादर केली जाण्याची शक्यता आहे.




**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६

# परिस्थितीवर मात करून ध्येय साध्य करा ज्ञानेश्वर गव्हाणे यांचे युवकांना आवाहन




*फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देताना मान्यवर, स्पर्धक विद्यार्थी व अन्य.*

**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता आपले ध्येय साध्य करणे गरजेचे आहे. त्यांनी यावेळी स्वतःच्या जीवन प्रवासातील संघर्ष आणि यशाचा प्रवास उपस्थितांसमोर रेखाटला. त्यांच्या या प्रेरणादायी मनोगतामुळे तरुणांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली असून, उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. युवकांनी स्वतःला लाभलेल्या परिस्थिती आणि संघर्षावर मात करत यश संपादन केले पाहिजे. परिस्थितीवर मात करून ध्येय साध्य करा, असे प्रतिपादन प्रमुख अतिथी ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी केले. येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात शिक्षण महर्षी माधवराव पाटील (काका) २५ वी राज्यस्तरीय अंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा गुरुवारी (ता. २४) रोजी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर गव्हाणे होते. यावेळी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतीश शेळके, परीक्षक डॉ. अनिता मुदकण्णा, डॉ. लक्ष्मण बिराजदार, डॉ. सन्मुख मुच्छट्टे, डॉ. सायबण्णा घोडके आदींची उपस्थिती होती. ही स्पर्धा ‘आधुनिक भारताचा विकास आणि पर्यावरण संरक्षण याच्यात समन्वय आहे / नाही’ या विषयावर आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी विकासाची गती, पर्यावरणीय संतुलन, शाश्वत विकास, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन या मुद्द्यांवर अभ्यासपूर्ण व तर्कशुद्ध मते मांडली. स्पर्धेत संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथील अरब बुशरा जिकर व विकास धनंजय बनजगोळे यांनी प्रथम क्रमांक पटकावत ११ हजार रुपयांचे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र मिळविले. स्पर्धेच्या द्वितीय क्रमांकावर एम. पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील आदित्य ज्ञानेश्वर दराडे व प्रथमेश बळीराम गिरी यांनी बाजी मारली. त्यांना ७ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांक विधी महाविद्यालय, लातूर येथील ऋतुजा गोडबोले व दिशा राठोड यांनी मिळविला. त्यांना ५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. दरम्यान, उत्तेजनार्थ पारितोषिक (अनुकूल बाजू) महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील गीता माधव वाडकर यांना, तर उत्तेजनार्थ पारितोषिक (प्रतिकूल बाजू) श्रमजीवी अध्यापक महाविद्यालय, उमरगा येथील अंकिता प्रदीप गायकवाड यांना देण्यात आले. दोन्ही विजेत्यांना प्रत्येकी २ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी विकास आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही बाबींचा परस्परसंबंध विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केला. पर्यावरणीय संवर्धनाचा विचार करून विकासाची दिशा निश्चित करण्याची आवश्यकता तसेच विकास प्रक्रियेत पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्व यावरही विद्यार्थ्यांनी भूमिका मांडल्या. कुमारी ऋतुजा गोडबोले, सुप्रीत फुलारी यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी डॉ. मुदकण्णा म्हणाल्या की, स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचारशक्तीला, प्रभावी वक्तृत्वाला आणि समकालीन सामाजिक-पर्यावरणीय प्रश्नांकडे अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून पाहण्याच्या क्षमतेला व्यासपीठ मिळते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. बिराजदार म्हणाले की, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोपाळ कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. जयश्री सोमवंशी यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




# तिसगाव वसतिगृहाच्या बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तिसगाव येथील शासकीय आश्रम शाळेशी संलग्नित आदिवासी मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या बांधकामाची तातडीने चौकशी करून कामाची गुणवत्ता तपासण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुका यांनी आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांना आणि बांधकाम विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आले.वसतिगृहाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारे साहित्य, बांधकामाची गुणवत्ता, अंदाजपत्रकानुसार काम झाले आहे का, तसेच संबंधित तांत्रिक निकषांचे पालन केले जात आहे का, याची प्रत्यक्ष पाहणी करून तपासणी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.आदिवासी विद्यार्थिनींसाठी उभारण्यात येणारी ही इमारत सुरक्षित, मजबूत आणि दर्जेदार असणे आवश्यक आहे. त्यामुळे बांधकामात कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा त्रुटी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी आणि आवश्यक असल्यास दोष दूर करूनच पुढील काम करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.दरम्यान, या निवेदनाची दखल घेऊन संबंधित विभागाने बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ चौकशी करावी आणि चौकशीचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# महिला कृषी योगदानाला शासकीय मान्यता; ऑनलाइन अर्जाची सुविधा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** शेती क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असले, तरी अनेकदा त्यांना 'शेतकरी' म्हणून अधिकृत मान्यता मिळत नाही. हीच कसर भरून काढण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' अन्वये आता प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' दिले जाणार आहे. या योजनेबाबत करोडी येथे सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती चितळकर यांनी महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले आणि अर्ज प्रक्रिया समजावून सांगितली.शेतीमध्ये प्रत्यक्ष राबणाऱ्या महिलांना अधिकृत ओळख मिळावी आणि विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ व्हावे, हा या प्रमाणपत्राचा मुख्य उद्देश असल्याचे चितळकर यांनी स्पष्ट केले.स्वतःच्या नावावर जमीन असणे बंधनकारक नाही!या योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अर्जदार महिलेच्या स्वतःच्या नावावर शेती असणे बंधनकारक नाही. शेती, शेतमजुरी किंवा शेतीपूरक व्यवसायात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या १८ वर्षे व त्यावरील सर्व महिला या प्रमाणपत्रासाठी पात्र आहेत. यात खालील क्षेत्रांतील महिलांचा समावेश होतो:पीक उत्पादन, भाजीपाला व फळबाग लागवडदुग्ध व्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालनमत्स्यपालन आणि मधुमक्षिकापालनकृषी प्रक्रिया व मूल्यवर्धन उद्योगअशी आहे अर्ज आणि पडताळणी प्रक्रिया१. ऑनलाइन अर्ज: पात्र महिलांना *'महिला शेतकरी पोर्टल'*वर जाऊन आधार कार्ड आणि ओटीपी (OTP) पडताळणीद्वारे ऑनलाइन अर्ज करता येईल.२. स्थानिक पडताळणी: ऑनलाइन आलेले अर्ज कृषी विभागामार्फत संबंधित ग्रामसभा किंवा नगरपंचायत सभेसमोर पडताळणीसाठी ठेवले जातील.३. प्रमाणपत्र वाटप: स्थानिक पातळीवरील पडताळणी व सभेच्या मंजुरीनंतर पात्र महिलांना अधिकृत प्रमाणपत्र बहाल केले जाईल.प्रमाणपत्राचे फायदे हे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महिलांना शासकीय योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे. यामध्ये गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, कृषी यांत्रिकीकरण, विशेष प्रशिक्षण, कृषी प्रक्रिया उद्योग यांसह इतर सर्व शासकीय कृषी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी हे प्रमाणपत्र एक आवश्यक ओळखपत्र म्हणून काम करेल.२ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन येत्या २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ग्रामसभेपर्यंत गावातील जास्तीत जास्त महिलांनी या पोर्टलवर आपले अर्ज नोंदवावेत, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती चितळकर यांनी केले आहे.या मार्गदर्शन कार्यक्रमाला करोडी सरपंच सुनिता गवांदे, देविदास गवांदे, बचत गट सी.आर.पी. नीता गायकवाड, अंगणवाडी सेविका मंगल दवंडे यांच्यासह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६


## भामरागड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा




**भामरागड :** "राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रमांची व्यासपीठ नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव निर्माण करणारे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी सेवाभावातून समाजपरिवर्तनाचे माध्यम बनावे," असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष डाखरे यांनी केले.राजे विश्वेश्वर राव कला व वाणिज्य महाविद्यालय, भामरागड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. संतोष डाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रमोद घोनमोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कैलास निखाडे, डॉ. सुरेश डोहाने आणि कु. वैशाली मिच्छा उपस्थित होते.प्रास्ताविकातून डॉ. संतोष डाखरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक प्रश्नांची जाणीव ठेवून समाजाच्या विकासासाठी योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भारत सरकारच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देताना विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी 'विकसित भारत' उपक्रमांतर्गत ६० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.प्रमुख पाहुणे डॉ. कैलास निखाडे यांनी श्रमदानाचे महत्त्व विशद केले. डॉ. सुरेश डोहाने यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव करून दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रमोद घोनमोडे यांनी विद्यार्थ्यांनी समाजसेवेसाठी सदैव तत्पर राहून सामाजिक विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन सोनू मडावी यांनी केले, तर आभार इरपा पुंगाटि यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

## कला महाविद्यालय बिडकीन येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा




**बिडकीन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संलग्नित एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी, समाजसेवा, राष्ट्रसेवा तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी मान्यवरांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितिन आहेर होते यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, "राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थी, शिक्षक आणि समाज यांना जोडणारी कडी आहे. एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न मिळता प्रत्यक्ष समाजजीवनातून समाजशिक्षणाचे धडे घेता येतात. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होते.'विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, रक्तदान आणि आरोग्य जनजागृती यांसारख्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ . रमेश गायकवाड यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेमागील इतिहास, उद्देश, स्वरूप, महत्त्व तसेच रासेयोची कार्यपद्धती यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सय्यद मुजीब माजी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, कला महाविद्यालय बिडकीन, यांनी एनएसएसच्या "Not Me But You" या ब्रीदवाक्याचा अर्थ स्पष्ट करताना सांगितले की, एनएसएस स्वयंसेवकाची कृती ही केवळ स्वतःच्या हितासाठी नसून समाजहितासाठी असते. समाजसेवेची प्रेरणा, राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव आणि 'मी नव्हे, तुम्ही' या सेवाभावी विचारातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते.समाजसेवेतून शिक्षण, व्यापक सामाजिक व राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रमुख उद्देश असल्याचेही डॉ . सय्यद यांनी सांगितले कला महाविद्यालय बिडकीन येथे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.मिलिंद ठोकळे आणि डॉ.रमेश गायकवाड यांच्या माध्यमातूनराष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा आणि नशा मुक्त जनजागरण रॅली स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. मिलिंद ठोकळे कार्यक्रमाधिकारी यांनी केले, तर डॉ. मुखत्यार शेख यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केलेकार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी IQAC प्रमुख डॉ. रामकिसन मुंडे, डॉ. अंजली काळे, डॉ. मोहसीन शेख यांनी सहकार्य केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश महासंघ आयोजित गायन स्पर्धेत भाग्यश्री वाकळे प्रथम



**कन्नड (अरुण थोरात) :** गणेश महासंघ कन्नड येथे नुकत्याच पार पडलेल्या, एकल गायन स्पर्धा, एक नृत्य स्पर्धा, सामूहिक नृत्य, सामुहिक नाटक आदी स्पर्धा घेण्यात आल्या, त्यात एकल गायन स्पर्धेमध्ये कु,भाग्यश्री नारायण वाकळे, कळंकीकर काशीनाथ पाटील विद्यालय कन्नड. हीने प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिचा सत्कार, महासंघाचे अध्यक्ष, सत्यम राठोड यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पवन राजे सोनवणे, व पदाधिकारी यांचेसह पत्रकार सहयोग जावळे, प्रविण जंजाळ, डॉ. सदाशिव पाटील, राजेंद्र गव्हाणे, अनिल खंबाट, श्री शिंदे, निवेदक प्रवीण दाभाडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. परीक्षक म्हणुन श्री जावळे, श्रीमती राठोड, श्रीमती बाविस्कर यांनी परिक्षण केले. यातील स्पर्धकांना मेडल देण्यात आले, तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय. क्रमांक विजेत्या स्पर्धकांना पदक, स्मृतीचिन्हे, बक्षीस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन उत्कृष्ट शरीरसौष्ठव स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाला सुवर्ण पदक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन उत्कृष्ट शरीरसौष्ठव या क्रीडा स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयातील बी. एस्सी. तृतीय वर्षाच्या करण जाधव या विद्यार्थ्याने सुवर्णपदक प्राप्त केले आहे.या यशाबद्दल श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव, कोषाध्यक्ष ॲड. प्रा. श्रीनिवास जाधव, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, उपप्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागप्रमुख तथा प्रभारी क्रीडा संचालक डॉ. साहेबराव मोरे आणि शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. राहुल सरोदे यांनी मार्गदर्शन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६


## रा.से. यो. उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सेवा- समर्पण भाव जोपासावा




**नवीन नांदेड (प्रतिनिधी) :** राष्ट्र आणि समाजाप्रती सेवा आणि समर्पण भाव ठेवून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी केले. वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. शेखर घुंगरवार यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना विद्यार्थ्यांना हा संदेश दिला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे माजी रासेयो समन्वयक प्रो. डॉ. नागेश कांबळे यांची विशेष उपस्थिती होती. प्रो. डॉ. रेणुका मोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार मोरे उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजयकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले.यावेळी प्रो. डॉ. नागेश कांबळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजसेवेच्या माध्यमातून राष्ट्रनिर्माणात युवकांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा से यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. किशोर सुर्यवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. रणवीर डी. वाय. यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. आर.एम.कांगणे, डॉ. सुनीता गरुड, डॉ. गणेश लिंगमपल्ले, डॉ. डी. एस. पालीमकर, डॉ. उत्तम कानवटे, डॉ. साहेबराव मोरे, डॉ. संजय गिरे, डॉ. साहेबराव शिंदे, प्रा. कविता हंबर्डे, प्रा. नितीन मुंडलोड,डॉ. राम अय्यर,प्रा. मिर्झा जुनेद, प्रा. राहुल सरोदे, प्रा. पंढरीनाथ गड्डुपवार, प्रा. राहुल पडोळे, डॉ. रत्नपारखे, प्रा.महेश जाधव तसेच कार्यालयीन कर्मचारी बालाजी कोडतीवार, रियाज शेख यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## मायबाप सरकार

मायबाप सरकार,
आता तुम्हीच सांगावे.
आम्ही आमच्या अडचणी,
आता कोणाकडे मांडावे. १

अस्मानी सुलतानी संकट,
सदा एकामागे एक येतात.
एकाच वेळी येऊन संकटे,
दारावर दस्तक का देतात. २

मायबाप सरकार आम्हाला,
नको अनुदानाची भीक,
बांधा बांधला पाणी आणावे,
कष्टाने पिकवू भरघोस पीक. ३

बांधा बांधाला पाणी आणून,
सरकारने व्यवस्था करावी.
कर्जमाफी,अनुदान नको,
पिकास भाव देऊन तारावी. ४

महागाईच्या निर्देशांकानुसार,
शेतीमालाचे भाव वाढावे.
दर सहा महिन्याला शेतीमाल,
भाववाढीचे परिपत्रक काढावे. ५

शेतकऱ्यांच्या मालाला स्वतः
शेतकरीच भाव लावणार.
असे परिपत्रक काढून कधी,
सरकार मदतीला धावणार. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## जाता जाता बाप्पा

जाता जाता बाप्पा
तेवढं ढगांना हलवून जा
बळीराजा बापाला
दान पावसाचं देऊन जा

आता हलत नाही बाप्पा
कोणी कोणासाठी
माणसाला राहिली नाही
जाण माणसाची

डोंगरा एवढं संकटं बाप्पा
शेतशिवार सोसत आहे
विघ्नहर्त्या तुला सांगतो
काटा काळजात बोचत आहे

भेगाळली काळी माती
पिक माना टाकत आहे
फितुर वाऱ्यासोबत
ढग रोज पळत आहे

बहात्तरी दुष्काळाची
चाहूल पुन्हा येत आहे
डोळ्यादेखत हिरव स्वप्न
शिवारभर जळत आहे

कर्जाच्या उन्हामध्ये
बाप तळून गेला आहे
लेकरांच्या भविष्यासाठी
तरी पुन्हा उभा आहे

जाता जाता बाप्पा
आस मातीची समजून घे
कष्टकरी बापाला माझ्या
जगण्याची उमेद दे

**- ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

## सामाजिक बांधिलकी जपणे हा एन. एस. एसच्या विद्यार्थ्यांचा गुण : डॉ. सदाशिव मुळे



**करमाड :** राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) स्थापना दिन गुरुवारी, २४ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना, उद्दिष्टे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील तिचे महत्त्व स्पष्ट केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे अध्यक्षीय भाषण करताना म्हणाले महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून भारत सरकारने २४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.एन एस एस चे महत्व सांगताना म्हणाले 'मी नव्हे, तुम्ही' अर्थात Not Me But You हे एनएसएसचे ब्रीदवाक्य असून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम निर्माण करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजाशी प्रत्यक्ष जोडले जाते. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य जनजागृती, रक्तदान, ग्रामविकास आणि सामाजिक समतेसारख्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर यांनी केले, तर डॉ. सुखदेव पोटदुखी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक डॉ. अश्विनकुमार चिंचोलीकर, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील, व आदी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे एनएसएस स्थापना दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## टंचाई व पीक पाहणी साठीउपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उद्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचा उद्या दिनांक २६ सप्टेंबर शनिवार, रोजी बीड जिल्ह्यामध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती पाहणी दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यादरम्यान त्या बीड जिल्ह्यातील विविध भागांना प्रत्यक्ष भेट देऊन पीक परिस्थितीचा व टंचाईसदृश परिस्थितीचा आढावा घेणार आहेत.दुपारी अडीच वाजता माजलगाव तालुक्यातील माली पारगाव येथे आगमन होऊन पीक परिस्थिती पाहणी पार पडेल. त्यानंतर दुपारी तीन वाजता माजलगाव तालुक्यातील वारोळा येथे आगमन होईल आणि तेथील पीक परिस्थितीची पाहणी केली जाईल. यानंतर सायंकाळी चार वाजून पाच मिनिटांनी गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे आगमन व पीक परिस्थिती पाहणी दौरा संपन्न होईल.बीड जिल्ह्यातील नियोजित पाहणी दौरा आटोपून उपमुख्यमंत्री यांचा काफ़िला छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे मार्गस्थ होईल.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६

## सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी प्रबोधनाचे जागरण महत्वाचे योगगुरू कलावती शिवमूर्ती भातांब्रे




**उदगीर (प्रतिनिधी) :** समाज आणि शिक्षण हे दोन्ही एकमेकावर आधारित व एकमेकांवर परिणाम करणारे आहेत. समाजातल्या विकृतीला संपवता येते परंतु शिक्षण क्षेत्रातल्या भ्रष्टाचारामुळे वाढणारी विकृती मात्र भयंकर ठरते. अशावेळी शिक्षण क्षेत्रातल्या अनागोंदीवर आणि भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी नीती आणि भक्तीचा गोंधळ घालून सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी चे प्रबोधनात्मक जागरण महत्वाचे ठरते. असे मत योगगुरू कलावती शिवमूर्ती भातांब्रे यांनी व्यक्त केले. चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षापासून सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादचे 369 वे पुष्प श्रीमती भगवतीताई टवानी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी प्रसिद्ध योग शिक्षिका कलावती शिवमूर्ती भातांब्रे यांनी भारत सातपुते लिखित जागरण या साहित्यकृतीवर अत्यंत प्रभावी संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की अत्यंत प्रतीकुल परिस्थितीतून शिक्षक बनलेले भारत सातपुते यांनी अन्याय आणि भ्रष्टाचारविरुद्ध निर्भय वृत्तीने संघर्ष करत शिक्षण क्षेत्रात राबवलेले विविध उपक्रम, कॉपीमुक्त अभियान त्यातून केलेले समाज प्रबोधन हे नव्या पिढीच्या उज्वल भविष्यासाठीचे महत्वपूर्ण जागरणच आहे. यानंतर उपस्थितांमध्ये सुंदर अशी चर्चा घडून आली. यामध्ये मुरलीधर जाधव, ऊषा तोंडचिरकर, डॉ.नामदेव खांडगावे, भागवत जाधव व गुंडप्पा पटणे यांचे सह अनेकांनी चर्चेत सहभाग घेतला. यानंतर उपस्थितितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती भगवतीताई टवानी म्हणाल्या की जगात सर्वच वाईट नाहीत. पण वाईट संघटित आहेत. सज्जन खूप आहेत परंतु ते विखुरलेले आहेत. उद्याच्या देशाचे आधारस्तंभ असणारे तरुण यांना संघर्षातून समाजाकडे नेणारे जागरण हे सज्जनांच्या एकत्रीकरणासाठीच आहे. हनुमंत म्हेत्रे यांनी सूत्र संचलन केले, संवादकाचा परिचय ऊषा तोंडचिरकर यांनी करून दिला. तर या कार्यक्रमाचे आभार सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा.राजपाल पाटील, योगगुरू शिवमूर्ती भातांब्रे, तुळशीदास बिरादार , सुरेश वजनम, आनंद बिरादार व संयोजक अनंत कदम यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

१ २ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry , MLT, CLS)
X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

# साहित्याच्या शिवारात धडपडणारा युवा कवी : ऋषिकेश आव्हाळे

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या कन्नड तालुक्याच्या मातीतून मराठी साहित्याच्या शिवारात आपले पाऊल घट्ट रोवणारा आणि वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी आपल्या शब्दांनी वाचकांच्या मनात घर करणारा एक संवेदनशील युवा चेहरा म्हणजे ऋषिकेश कारभारी आव्हाळे, अर्थात साहित्य वर्तुळात कविराज रीष म्हणून परिचित असलेला युवा साहित्यिक. आज जिथे तरुणाई मोबाईल आणि आभासी जगात हरवली आहे, तिथे हातात पुस्तक आणि मनात कविता घेऊन चालणारा हा तरुण मराठवाड्याच्या साहित्यिक परंपरेला नवा आयाम देत आहे आणि हीच त्याची सगळ्यात मोठी ओळख आहे.ऋषिकेश हा तिफण परिवारातील युवा कवी म्हणून ओळखला जातो. त्याच्या साहित्यिक जडणघडणीत तिफणचा वाटा मोठा आहे. तिफण कविता महोत्सवातूनच त्याला खऱ्या अर्थाने मोठे आणि राज्यस्तरीय व्यासपीठ मिळाले. अनेक दिग्गज कवींच्या मांदियाळीत आपली कविता सादर करण्याची संधी तिफणने त्याला दिली आणि त्याच विश्वासाच्या बळावर त्याला शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या बालकुमार काव्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविण्याचा बहुमान मिळाला. इतक्या कोवळ्या वयात एखाद्या काव्य संमेलनाचे अध्यक्ष होणे ही गोष्ट सोपी नाही, पण ऋषिकेशने आपल्या अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषणातून आणि कवितांमधून ती जबाबदारी लीलया पेलली. या संमेलनात त्याने उपस्थित असलेल्या शेकडो बालकुमारांना कवितेकडे कसे वळावे, वाचन कसे वाढवावे आणि शब्दांवर प्रेम कसे करावे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. हा क्षण केवळ ऋषिकेशसाठीच नाही तर संपूर्ण तिफण परिवारासाठी अभिमानाचा क्षण होता.ऋषिकेशच्या बालपणाबद्दल सांगायचे तर त्याचे बालपण कन्नडच्या ग्रामीण परिसरात गेले. घरात शिक्षणाचे आणि संस्काराचे वातावरण होते. लहानपणापासूनच त्याला वाचनाची गोडी लागली ती त्याच्या आजोबांमुळे. संध्याकाळी ओसरीवर बसून जेव्हा आजोबा एखादे पुस्तक वाचत असत, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे हसू, दुःख आणि गंभीरता ऋषिकेश निरखून पाहायचा. शब्दांमध्ये एवढी ताकद असते की ती माणसाला हसवू शकते, रडवू शकते आणि विचार करायला लावू शकते, हे त्याला तेव्हाच कळले. पुढे मोठ्या भावंडांची शालेय पुस्तके, गोष्टीची पुस्तके, विविध कादंबऱ्या आणि साहित्यकृती वाचता वाचता त्याची शब्दांशी घट्ट मैत्री निर्माण झाली. पुस्तकातील प्रत्येक पान त्याला एका नव्या विश्वात घेऊन जात असे आणि त्या विश्वात तो हरवून जायचा.शालेय जीवनात असताना एका छोट्याशा गैरसमजातून त्याच्या हातून पहिली कविता लिहिली गेली. ती कविता म्हणजे राग, प्रेम, आणि वेदना यांचे एक अनोखे मिश्रण होते. वर्गात असताना घडलेल्या एका प्रसंगातून ती कविता जन्माला आली. त्या कवितेला शिक्षकांनी दिलेली दाद आणि मित्रांनी केलेले कौतुक यामुळे त्याच्या मनात कवितेबद्दल एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला. हळूहळू ही आवड छंदात आणि छंदाचे रूपांतर ध्यासात झाले. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शालेय व्यासपीठावर त्याने पहिली कविता सादर केली. थरथरणाऱ्या आवाजात आणि धडधडत्या छातीने सादर केलेली ती कविता श्रोत्यांच्या काळजाला भिडली आणि टाळ्यांच्या कडकडाटातच त्याच्या साहित्यिक प्रवासाची अधिकृत सुरुवात झाली.गेल्या सात वर्षांच्या या अखंड प्रवासात ऋषिकेशने कधीही मागे वळून पाहिले नाही. आजवर त्याने अडीचशेहून अधिक स्वलिखित कविता लिहिल्या आहेत. प्रेम, निसर्ग, आईची माया, सामाजिक विषमता, तरुणाईचा संघर्ष, शेतकऱ्याचे दुःख आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव हे त्याच्या कवितेचे मुख्य विषय राहिले आहेत. त्याची कविता ही केवळ शब्दांचा खेळ नाही तर ती मनातून आलेली आर्त हाक आहे. केवळ लिहून तो थांबला नाही तर दीडशेहून अधिक राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय काव्यलेखन स्पर्धांमध्ये त्याने सहभाग नोंदवून आपल्या लेखणीला अधिक धार दिली. आई, शब्द प्रेम माझी दुनिया, मुव्ह ऑन, काव्यलता आणि काव्यतारा यांसह अनेक प्रतिष्ठित सामाईक काव्यसंग्रहांमध्ये त्याच्या रचनांचा समावेश झाला आहे. विविध दैनिकांच्या साहित्य पुरवण्या, साप्ताहिके, मासिके आणि साहित्यिक नियतकालिकांमधून त्याच्या कविता नियमितपणे प्रकाशित होत असतात आणि वाचक त्याला पसंती देत असतात.ऋषिकेशच्या या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक लेखनाची दखल साहित्य क्षेत्राने वेळोवेळी घेतली आहे. त्याच्या कार्याचा गौरव म्हणून त्याला प्रजासत्ताक अमृत पुरस्कार २०२४ अंतर्गत साहित्य सेवा पुरस्कार, युंगधरा साहित्य वैभव पुरस्कार आणि भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचतर्फे दिला जाणारा युवा साहित्यिक पुरस्कार अशा मानाच्या सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. हे पुरस्कार म्हणजे त्याच्यासाठी केवळ सन्मानपत्रे नाहीत तर भविष्यात अधिक चांगले आणि जबाबदारीने लिहिण्याची एक मोठी जबाबदारी आहे, असे तो नेहमी नम्रपणे सांगतो.साहित्यिक लेखनासोबतच ऋषिकेश हा चळवळीतील एक सक्रिय कार्यकर्ता म्हणूनही ओळखला जातो. भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची धुरा तो २०२२ पासून अत्यंत यशस्वीपणे सांभाळत आहे. या माध्यमातून त्याने अनेक नवोदित आणि ग्रामीण भागातील कवींना व्यासपीठ मिळवून दिले आहे, त्यांचे लेखन तपासून त्यांना मार्गदर्शन केले आहे. सत्त्याण्णवव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सातारा येथे झालेल्या प्रतिष्ठेच्या कवीकट्टा कार्यक्रमात त्याने आपल्या दमदार कवितांचे सादरीकरण करून उपस्थित रसिकांची आणि ज्येष्ठ साहित्यिकांची वाहवा मिळवली होती. तिफण राज्यस्तरीय कविसंमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्याने आपली उपस्थिती दर्शवली आहे.शाळा आणि महाविद्यालयांच्या विविध साहित्यिक व्यासपीठांवर प्रमुख अतिथी आणि व्याख्याते म्हणून तो नियमितपणे उपस्थित राहतो. विद्यार्थ्यांना साहित्याचे महत्त्व पटवून देण्याचे काम तो करतो. याशिवाय भारूड, एकांकिका, सूत्रसंचालन आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्येही त्याचा सक्रिय सहभाग असतो.शैक्षणिक पार्श्वभूमीबद्दल सांगायचे झाले तर त्याने एम.एस.एस. जालना येथून डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे आणि सध्या तो पी.ई.एस. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, छत्रपती संभाजीनगर येथे बी.टेक. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. अनेकांना वाटते की इंजिनिअरिंग आणि साहित्य हे दोन परस्परविरोधी प्रवाह आहेत, पण ऋषिकेशने हे दोन्ही प्रवाह एकाच नदीत अत्यंत सुंदररित्या एकत्र आणले आहेत.कवितेच्या माध्यमातून भावना व्यक्त करणाऱ्या ऋषिकेशने आता गद्यलेखनाकडेही आपले पाऊल टाकले आहे. त्याची पहिली कादंबरी वादळ ही सध्या प्रकाशनाच्या अंतिम टप्प्यात असून लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे. या कादंबरीत त्याने ग्रामीण भागातील तरुणाच्या आयुष्यातील संघर्षाची अत्यंत हृदयस्पर्शी कथा मांडली आहे. काव्यलेखनापासून कादंबरी लेखनाकडे झालेला हा प्रवास त्याच्या साहित्यिक वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.आजच्या धावपळीच्या युगात मराठी साहित्य टिकवून ठेवण्यासाठी ऋषिकेश आव्हाळे सारख्या युवकांची गरज आहे. साहित्याच्या शिवारात प्रामाणिकपणे धडपडणारा हा युवा कवी निश्चितच उद्या मराठी साहित्याच्या आकाशात तेजस्वी तारा म्हणून चमकेल.

**डॉ. शिवाजी हुसे**
**संपादक - त्रैमासिक तिफण**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ सप्टेंबर २०२६


# शिक्षणव्यवस्थेचा आरसा : शिक्षक, पालक आणि विद्यार्थी

आम्ही लहान होतो त्या काळात आई-वडिलांसाठी मुलांची शाळा हा केवळ शाळेचा विषय नव्हता; तो त्यांच्या आयुष्याचा एक भाग होता. शाळेला एक दिवसही दांडी मारायची नाही, अभ्यास राहता कामा नये, शिक्षकांनी दिलेले काम पूर्ण झाले पाहिजे—याकडे घरातूनच काटेकोरपणे लक्ष दिले जात असे. आई शिकलेली असली तरी इंग्रजी, गणित किंवा विज्ञान यातील एखादा विषय तिच्या आवाक्याबाहेर असेल, तर वडील स्वतःची इतर कामे बाजूला ठेवून मुलाचा अभ्यास करून घेत. स्वतःला फारसे शिक्षण मिळाले नसले तरी मुलाने शिकले पाहिजे, मोठे झाले पाहिजे, ही त्या पिढीची तळमळ होती. त्यांच्याकडे पैसा कमी होता; पण मुलांच्या शिक्षणासाठी वेळ, कष्ट आणि त्यागाची कमतरता नव्हती.आज परिस्थिती बदलली आहे. शिक्षण अधिक आधुनिक झाले, अभ्यासक्रम बदलले, तंत्रज्ञान आले; पण या सगळ्या बदलांच्या गर्दीत *मुलाला खरे काय येते आणि काय येत नाही*, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न अनेकदा मागे पडताना दिसतो. गणितातील उदाहरण चुकले तर मुलाची चूक शोधण्यापेक्षा त्याला ते समजले का, त्याच्या अडचणी कुठे आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे. वडील आईच्या शिकवण्यातील चुका काढत राहिले आणि आई-वडीलच एकमेकांवर दोष टाकत राहिले, तर मुलाच्या हातात पुस्तक राहते; पण ज्ञान त्याच्या डोक्यात पोहोचत नाही.शिक्षकाची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारा कर्मचारी नसून विद्यार्थ्याच्या भविष्याला दिशा देणारा मार्गदर्शक असतो. मात्र काही ठिकाणी शिक्षणापेक्षा खासगी शिकवणी,आर्थिक व्यवहार आणि स्वतःच्या फायद्याला अधिक महत्त्व दिल्याच्या तक्रारी ऐकायला मिळतात. विद्यार्थ्याला वर्गात काय समजले, कोणत्या मुलाला कोणत्या विषयात अडचण आहे, कोण मागे आहे आणि कोणाला अधिक मार्गदर्शनाची गरज आहे याकडे वैयक्तिक लक्ष देणे ही शिक्षकाची खरी जबाबदारी असते पण *वर्गात शिकवून नंतर त्याच विद्यार्थ्याला खासगी शिकवणीची गरज निर्माण करणे ही शिक्षणव्यवस्थेसमोर विचार करण्यासारखी एक मोठी बाब झाली आहे.*आज शिक्षकाने विद्यार्थ्याला एखादा प्रश्न विचारला तरी भीती, त्याची चूक दाखवली तरी भीती आणि त्याचे कौतुक केले तरी मोठा गैरसमज होण्याची शक्यता अशी विचित्र परिस्थिती आज निर्माण झाली आहे. शिस्त राखण्याच्या नावाखाली विद्यार्थ्याला अपमानित करणे चुकीचे आहे; पण विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन करणे, त्याची चूक समजावून सांगणे किंवा त्याच्या प्रगतीसाठी कठोर भूमिका घेणे यालाही गुन्हेगारी स्वरूप देणे योग्य नाही. मुलाला प्रेमही हवे आणि शिस्तही हवी. *शिक्षकाच्या हातात अधिकार नसतील आणि पालकांच्या हातात वेळ नसेल, तर मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी नेमकी कोण घेणार?*याचबरोबर शिक्षकांवर लादल्या जाणाऱ्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांचाही विचार झाला पाहिजे. निवडणूक ड्युटी, विविध शासकीय कामे, सर्वेक्षणे, अहवाल, प्रशिक्षण आणि इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या यामुळे शिक्षकाचा मोठा वेळ वर्गाबाहेर जात असेल, तर त्याचा परिणाम अध्यापनावर होणारच. शिक्षक हा प्रथम शिक्षक आहे की सरकारी यंत्रणेतील बहुउद्देशीय कर्मचारी, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सुट्ट्या, प्रशासकीय कामे, सतत बदलणारे नियम आणि अभ्यासक्रमातील बदल यांचा एकत्रित परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणावर होत आहे.प्रत्येक नवीन सरकार, नवीन शिक्षणमंत्री किंवा नवीन धोरणासोबत नियम बदलत राहिले आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा भार शिक्षकांवर टाकला गेला, तर सातत्यपूर्ण शिक्षणव्यवस्था कशी निर्माण होणार? शिक्षण हे प्रयोग करण्याचे क्षेत्र नाही; प्रत्येक बदलामागे दीर्घकालीन विचार, शिक्षकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा केंद्रबिंदू असणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन शिक्षणाची परिस्थितीही वेगळी नाही. शिक्षकांना त्यांच्या अध्यापनाच्या कामाव्यतिरिक्त विविध प्रशासकीय, सामाजिक किंवा इतर जबाबदाऱ्यांमध्ये गुंतवले गेले, तर वर्गातील विद्यार्थ्यांचा वेळ कोण भरून काढणार? एखादा वर्ग रिकामा राहतो, विद्यार्थ्यांचे तास होत नाहीत, अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही याचा परिणाम शेवटी विद्यार्थ्यालाच द्यावा लागतो. विद्यार्थ्याचे एक वर्ष गेले तरी त्याच्या आयुष्यातील ते वर्ष परत येत नाही.सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे *शिक्षक या शब्दाचा अर्थच आपण संकुचित केला आहे का?* एखाद्याकडे अनेक पदव्या असतील म्हणून तो उत्तम शिक्षक ठरत नाही. शिक्षक होण्यासाठी केवळ पदवी नव्हे, तर विद्यार्थ्याला शिकवण्याची क्षमता, विषयाचे ज्ञान, संयम, संवेदनशीलता आणि विद्यार्थ्याच्या भविष्याची जाणीव आवश्यक असते. प्रत्यक्ष वर्गात शिकवण्याचा अनुभव नसतानाही केवळ पदव्या किंवा पदामुळे शिक्षणक्षेत्रातील प्रतिनिधित्वाचा दावा केला जात असेल, तर त्या व्यवस्थेने स्वतःकडे प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे.आज शिक्षणाच्या केंद्रस्थानी *विद्यार्थी* असायला हवा; शिक्षक, पालक, सरकार, राजकारण किंवा प्रशासन नव्हे. शिक्षकाला योग्य स्वातंत्र्य, योग्य जबाबदारी आणि आवश्यक संरक्षण मिळाले पाहिजे. त्याच वेळी गैरप्रकार करणाऱ्या शिक्षकांवर किंवा शिक्षणसंस्थांवर पारदर्शक आणि न्याय्य कारवाईही झाली पाहिजे. नियम असावेत, पण ते शिक्षण सुधारण्यासाठी असावेत; भीती निर्माण करण्यासाठी नव्हे.कारण शेवटी प्रश्न शिक्षकाचा नाही, सरकारचा नाही, पालकांचा नाही—प्रश्न आहे *आपल्या मुलांच्या भविष्याचा.* आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्याला केवळ परीक्षा पास करणारा विद्यार्थी बनवायचे की विचार करणारा, प्रश्न विचारणारा, जबाबदार आणि सक्षम माणूस बनवायचे, हे आपण ठरवायचे आहे.आज शिक्षणव्यवस्थेला सर्वांत जास्त गरज आहे ती नवीन नियमांची नव्हे, तर *जुन्या काळातील पालकांच्या तळमळीची, शिक्षकाच्या प्रामाणिकतेची आणि विद्यार्थ्याच्या भविष्याची * शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला असे म्हणणे सोपे आहे; पण तो थांबवायचा असेल तर प्रत्येकाने स्वतःला एकच प्रश्न विचारला पाहिजे “ आपण मुलाला शिक्षण देत आहोत की फक्त त्याला पुढच्या वर्गात ढकलत आहोत?”



**डॉ. सतिश लिला नामदेव दोडके, ठाणे**

## अंत्योदयाचा विकास हा पंडित दीनदयाळ यांच्या विचारांचा केंद्रबिंदू - डॉ. संजय सांभाळकर




**फुलंब्री :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा समाजातील शेवटच्या घटकाचा विकास अर्थात अंत्योदय हा आहे, असे प्रतिपादन डॉ. संजय सांभाळकर यांनी केले. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने २५ सप्टेंबर २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.‘पंडित दीनदयाळ उपाध्याय : विचार व कार्य’ या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सांभाळकर यांनी भांडवलशाही व समाजवादी व्यवस्थेतील मर्यादा स्पष्ट करून व्यक्ती आणि समाजहित यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांच्या संतुलित विकासातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधला जाऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले. शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. त्यांनी दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचा केंद्रबिंदू सामान्य माणसाचे हित असल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दिनेश कचकुरे यांनी, पाहुण्यांचा परिचय डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी करून दिला तर सुविचार डॉ. नितीन माळेगावकर यांनी सांगितला.तर आभार डॉ. संदीप जगताप यांनी मानले.

## शिवाजी महाविद्यालय येथे नेत्र तपासणी शिबीर संपन्न



**कन्नड(अरुण थोरात):** राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसा निमित्त शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे भव्य नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले.शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एनएसएस स्थापना दिवसा निमित्त भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदरील शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर यांनी केले या प्रसंगी त्यांनी म्हटले की, " नेत्र हेच विश्व आहे कारण डोळे निरोगी असतील तर आपण हे सुंदर जग पाहू सर्वांनी नियमितपने नेत्र तपासले पाहिजे" महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी शुभेच्छा दिल्या.सदरील नेत्र शिबिरात नेत्र तपासणी साठी ग्रामीण रुग्णालय, कन्नड येथील नेत्र विभागाचे डॉ. पोटफाडे उपस्थित होते या वेळी 107 स्वंयसेवक विद्यार्थी, 40 प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपले डोळे तपासून सहभाग घेतलाया शिबिराच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी डॉ. राकेश अहिरराव यांनी केले व आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन यांनी केले. या वेळी डॉ. सीमा काशीद, डॉ . शिवाजी हुसे, डॉ. रवींद्र घोती, डॉ. सुनील गोर्डे, डॉ. मंगेश जाधव, डॉ . रामचंद्र झाडे, डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ. प्रतिभा अहिरे, प्रा. संतोष देशमुख, प्रा. प्रगती चव्हाण, उपस्थित होते.

# जागतिक वारशातून महाराष्ट्राच्या पर्यटनाची वैश्विक ओळख

दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी जगभरात 'जागतिक पर्यटन दिन' साजरा केला जातो. पर्यटन म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, निसर्गरम्य स्थळांना भेट देणे किंवा विरंगुळा साधणे एवढ्यापुरते त्याचे स्वरूप मर्यादित राहिलेले नाही. आज पर्यटन हे सांस्कृतिक देवाणघेवाण, रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्था, पर्यावरणसंवर्धन आणि विविध समाजांना परस्परांशी जोडणारे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते पर्यटन हे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडलेले महत्त्वाचे क्षेत्र असून सांस्कृतिक व नैसर्गिक संपत्तीचा अनुभव घेण्याबरोबरच अनेक समाजांच्या उपजीविकेलाही त्यातून आधार मिळतो. २०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची अधिकृत संकल्पना 'पर्यटनाच्या पुनर्रचनेसाठी डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' अशी आहे. त्यामुळे यंदाच्या पर्यटन दिनाच्या निमित्ताने पर्यटनाच्या वाढीबरोबरच वारसा संवर्धन, स्थानिक सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यांचा विचार करणे आवश्यक ठरते.महाराष्ट्राच्या पर्यटनवैभवाचा विचार केला तर इतिहास, संस्कृती, स्थापत्य, निसर्ग आणि लोकजीवन यांचा अद्भुत संगम येथे पाहायला मिळतो. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, कोकणचा समुद्रकिनारा, प्राचीन शैललेणी, ऐतिहासिक किल्ले, मुंबईतील वैशिष्ट्यपूर्ण वास्तू, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा तसेच जैवविविधतेने समृद्ध पश्चिम घाट यांमुळे महाराष्ट्राला पर्यटनाच्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. या समृद्ध वारशातील अनेक स्थळांना युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली आहे. अजिंठा, वेरूळ आणि घारापुरीच्या प्राचीन लेण्यांपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुसमूह, पश्चिम घाट आणि २०२५ मध्ये जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया'पर्यंत महाराष्ट्राच्या जागतिक वारशाची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. हा वारसा महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि सांस्कृतिक समृद्धीची साक्ष देतानाच पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देणारा महत्त्वाचा आधार ठरतो.जागतिक वारसा म्हणून एखाद्या स्थळाला मिळणारी मान्यता ही केवळ पर्यटनाच्या दृष्टीने मिळालेली प्रतिष्ठा नसते. मानवी संस्कृती किंवा निसर्गाच्या दृष्टीने असाधारण सार्वत्रिक मूल्य असलेल्या स्थळाचे महत्त्व संपूर्ण मानवजातीच्या संदर्भात अधोरेखित करणारी ही मान्यता असते. त्यामुळे जागतिक वारसा स्थळे ही एखाद्या प्रदेशाची मालमत्ता न राहता व्यापक मानवतेचा सामूहिक ठेवा बनतात. महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे पाहिले असता प्राचीन बौद्ध कला, हिंदू आणि जैन स्थापत्य, शैलशिल्पकला, औद्योगिक युगातील वास्तुरचना, आधुनिक नागरी नियोजन, जैवविविधता आणि मराठा दुर्गव्यवस्था अशा विविध पैलूंचा परिचय होतो. म्हणूनच महाराष्ट्रातील वारसा पर्यटन हे इतिहास आणि वर्तमान यांना जोडणारे प्रभावी माध्यम ठरू शकते.महाराष्ट्राच्या प्राचीन सांस्कृतिक वैभवाचा विचार करताना अजिंठा लेण्यांना विशेष महत्त्व द्यावे लागते. वाघोरा नदीच्या परिसरातील डोंगरकड्यांमध्ये कोरलेल्या या लेणीसमूहात बौद्ध परंपरेशी संबंधित चैत्यगृहे, विहारे, शिल्पे आणि भित्तिचित्रे आढळतात. अजिंठ्याच्या भित्तिचित्रांमध्ये मानवी भावना, सामाजिक जीवन, पोशाख, अलंकार, राजदरबारी वातावरण आणि धार्मिक कथानकांचे कलात्मक चित्रण दिसते. त्यामुळे अजिंठा हा केवळ धार्मिक वारसा नसून प्राचीन भारतीय समाजजीवन आणि कलासंस्कृतीचा महत्त्वपूर्ण दृश्य दस्तऐवज आहे. युनेस्कोने १९८३ मध्ये अजिंठ्याचा जागतिक वारसा यादीत समावेश केला. आज देश-विदेशातील पर्यटक, संशोधक, विद्यार्थी आणि कलावंतांसाठी अजिंठा आकर्षणाचे केंद्र आहे. मात्र भित्तिचित्रे आणि शैलरचना अत्यंत नाजूक असल्यामुळे वाढती पर्यटकसंख्या, आर्द्रता, प्रकाश, मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणीय परिणाम यांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पर्यटनातून अजिंठ्याची ओळख वाढावी; परंतु पर्यटनाच्या दबावामुळे त्याच्या कलासंपदेचे नुकसान होऊ नये, हा समतोल जपणे गरजेचे आहे.अजिंठ्यानंतर वेरूळ लेणी महाराष्ट्राच्या जागतिक वारशातील आणखी एक अनमोल ठेवा आहे. दोन किलोमीटरपेक्षा अधिक परिसरात पसरलेल्या ३४ लेण्यांमध्ये बौद्ध, हिंदू आणि जैन परंपरांशी संबंधित स्थापत्य आणि शिल्पकलेचा संगम दिसतो. इ.स. सहाव्या ते बाराव्या शतकादरम्यान विकसित झालेला हा लेणीसमूह प्राचीन भारतातील कलात्मक आणि तांत्रिक प्रगतीचे दर्शन घडवतो. विविध धार्मिक परंपरांच्या वास्तू एकाच परिसरात विकसित झाल्यामुळे वेरूळला सांस्कृतिक सहअस्तित्वाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील कैलास मंदिर हे एकाच खडकातून साकारलेले भव्य स्थापत्य उदाहरण आहे. खडक कापण्याचे तंत्र, वास्तूचे नियोजन, सूक्ष्म शिल्पकला आणि अभियांत्रिकी कौशल्य यांचा अप्रतिम संगम येथे पाहायला मिळतो. युनेस्कोने १९८३ मध्ये वेरूळचा जागतिक वारसा म्हणून समावेश केला. त्यामुळे वेरूळ हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यटनाचे तसेच प्राचीन भारतीय स्थापत्यपरंपरेचे जागतिक प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे स्थळ आहे.मुंबईजवळील घारापुरी किंवा एलिफंटा लेणी महाराष्ट्राच्या जागतिक वारशातील आणखी एक महत्त्वाचे सांस्कृतिक स्थळ आहे. अरबी समुद्रातील घारापुरी बेटावर असलेल्या या लेण्यांमध्ये शिवपरंपरेशी संबंधित भव्य शैलशिल्पांचा आविष्कार दिसतो. मुख्य गुहेतील सुमारे सात मीटर उंचीचे 'सदाशिव' शिल्प या स्थळाचे प्रमुख आकर्षण आहे. या शिल्पात शिवाच्या तीन पैलूंचे प्रतीकात्मक दर्शन घडते. घारापुरी बेटावर इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून मानवी वस्तीचे पुरावे असल्याचे युनेस्कोच्या नोंदीत नमूद आहे, तर शैलगृहांची निर्मिती साधारणपणे इ.स. पाचव्या-सहाव्या शतकात झाली. युनेस्कोने १९८७ मध्ये घारापुरी लेण्यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली. मुंबईपासून समुद्रमार्गे पोहोचता येत असल्यामुळे या स्थळाला सांस्कृतिक तसेच पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. समुद्री वातावरण, बेटावरील पर्यावरण, पर्यटकांची गर्दी आणि पुरातत्त्वीय अवशेषांचे संरक्षण यांचा समतोल राखणे मात्र अत्यावश्यक आहे.महाराष्ट्राच्या जागतिक वारशात आधुनिक नागरी इतिहासाचे प्रतिनिधित्व करणारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे एक महत्त्वाचे स्थळ आहे. पूर्वीच्या व्हिक्टोरिया टर्मिनसची ही वास्तू व्हिक्टोरियन गॉथिक पुनरुज्जीवन स्थापत्यशैली आणि भारतीय पारंपरिक स्थापत्यघटक यांच्या संगमाचे उल्लेखनीय उदाहरण आहे. १८७८ मध्ये बांधकामास सुरुवात झालेल्या या वास्तूची निर्मिती सुमारे दहा वर्षांत पूर्ण झाली. घुमट, मनोरे, टोकदार कमानी, दगडी कोरीवकाम आणि विविध अलंकारिक घटक तिच्या स्थापत्यवैशिष्ट्याला अधोरेखित करतात. ब्रिटिश वास्तुविशारद आणि भारतीय कारागीर यांच्या सहकार्याने तयार झालेल्या या वास्तूत दोन स्थापत्यपरंपरांचा संवाद दिसतो. युनेस्कोने २००४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा जागतिक वारसा म्हणून समावेश केला. विशेष म्हणजे ही वास्तू आजही कार्यरत रेल्वे स्थानक आहे. त्यामुळे वारसा संवर्धन आणि आधुनिक सार्वजनिक वापर यांचा समतोल राखण्याचे हे महत्त्वाचे उदाहरण ठरते.मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुसमूह हा आधुनिक नागरी वारशाचा वेगळा आणि आकर्षक पैलू समोर आणतो. ओव्हल मैदानाच्या परिसरातील व्हिक्टोरियन गॉथिक शैलीतील सार्वजनिक वास्तू आणि त्याच्या पश्चिमेकडील आर्ट डेको इमारती मुंबईच्या नागरी विकासाच्या दोन महत्त्वपूर्ण टप्प्यांचे प्रतिनिधित्व करतात. व्हिक्टोरियन वास्तूंमध्ये युरोपीय शैलीसोबत भारतीय घटकांचा वापर आणि स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्यासाठी केलेली रचना दिसते. आर्ट डेको इमारतींमध्येही भारतीय रचनात्मक प्रभाव आणि आधुनिक स्थापत्यभाषेचा संगम आढळतो. युनेस्कोने २०१८ मध्ये या वास्तुसमूहाला जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली. या वास्तू मुंबईच्या आधुनिकतेच्या प्रवासाची साक्ष देतात. त्यामुळे मुंबईचे पर्यटन समुद्रकिनारे, बाजारपेठा आणि मनोरंजन यांपुरते मर्यादित न ठेवता वास्तुशास्त्र, नागरी नियोजन आणि आधुनिक इतिहासाच्या अभ्यासाशी जोडता येऊ शकते.महाराष्ट्राच्या जागतिक वारशात नैसर्गिक संपत्तीचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे. पश्चिम घाट हा महाराष्ट्रासह अनेक राज्यांत पसरलेला प्राचीन पर्वतीय प्रदेश आहे. युनेस्कोच्या मते पश्चिम घाट हिमालयापेक्षा जुना असून त्याचे भूआकृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. येथील पर्वतीय वनव्यवस्था भारतीय मान्सूनच्या हवामानावर प्रभाव टाकते. जैवविविधता आणि स्थानिक प्रजातींच्या दृष्टीने पश्चिम घाट जगातील महत्त्वपूर्ण जैवविविधता क्षेत्रांपैकी एक आहे. युनेस्कोने पश्चिम घाटाच्या नैसर्गिक वारशाला जागतिक महत्त्व दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पश्चिम घाट परिसरात निसर्गभ्रमंती, पक्षीनिरीक्षण, जैवविविधता अभ्यास, गिरिभ्रमण आणि पर्यावरणशिक्षण यांसारख्या पर्यटनप्रकारांना मोठी संधी आहे. परंतु निसर्गपर्यटनाच्या नावाखाली अनियंत्रित बांधकाम, जंगलांवरील दबाव, प्लास्टिक कचरा, जलप्रदूषण आणि पर्यटकांची अनियंत्रित गर्दी वाढणे टाळणे आवश्यक आहे. निसर्ग हा पर्यटनाचा उपभोग घेण्याचा विषय नसून संवर्धनासह अनुभवण्याची सामूहिक संपत्ती आहे.महाराष्ट्राच्या जागतिक पर्यटनाच्या नकाशावर अलीकडील काळात झालेली महत्त्वाची भर म्हणजे 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया'. २०२५ मध्ये या मालिकेचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला. या मालिकेत बारा प्रमुख किल्ल्यांचा समावेश आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, खांदेरी, प्रतापगड, राजगड, पन्हाळा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग हे अकरा किल्ले आहेत, तर जिंजी किल्ला तमिळनाडूमध्ये आहे. हे किल्ले सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीपर्यंत बांधले, विकसित किंवा विस्तारले गेले. डोंगराळ आणि सागरी भूभागाचा संरक्षणव्यवस्थेसाठी केलेला कल्पक वापर हे या दुर्गव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. युनेस्कोने या किल्ल्यांच्या जाळ्याला मराठा लष्करी रणनीती आणि भूगोलाशी एकरूप झालेल्या संरक्षणव्यवस्थेचे प्रतिनिधित्व मानले आहे.या नव्या जागतिक वारसा मान्यतेमुळे महाराष्ट्राच्या दुर्गपर्यटनाला आंतरराष्ट्रीय संदर्भ प्राप्त झाला आहे. विशेषतः नाशिक जिल्ह्यातील साल्हेर किल्ल्याचा या वारसा मालिकेत समावेश झाल्यामुळे नाशिकच्या पर्यटनात ऐतिहासिक दुर्गसंस्कृतीचा महत्त्वपूर्ण आयाम अधिक ठळक झाला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे सागरी किल्ले समुद्री संरक्षणव्यवस्थेची आणि किनारी भूगोलाशी जुळलेल्या इतिहासाची ओळख करून देतात. दुसरीकडे रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, पन्हाळा आणि साल्हेरसारखे किल्ले सह्याद्रीच्या भूगोलाशी जोडलेल्या दुर्गव्यवस्थेचे दर्शन घडवतात. त्यामुळे महाराष्ट्रात वारसा किल्ल्यांचे पर्यटन विकसित करताना केवळ किल्ल्यांची वास्तू न दाखवता त्यांचा भूगोल, स्थानिक समाज, लोकपरंपरा, जैवविविधता आणि ऐतिहासिक संदर्भ पर्यटकांसमोर मांडणे आवश्यक आहे.जागतिक वारसा स्थळांचे पर्यटन स्थानिक समाजाच्या विकासाशी जोडले गेले तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. वारसा स्थळांच्या परिसरातील युवकांना प्रशिक्षित पर्यटनमार्गदर्शक, वारसा-दुभाषे आणि डिजिटल माहितीसेवा पुरवठादार म्हणून संधी देता येऊ शकते. स्थानिक महिलांना पारंपरिक खाद्यसंस्कृती, हस्तकला आणि लघुउद्योगांशी जोडता येते. स्थानिक कलाकार, वाहनचालक, निवासव्यवस्था पुरविणारे उद्योजक आणि इतर लघुव्यावसायिक यांनाही पर्यटनातून रोजगार मिळू शकतो. अशा प्रकारे पर्यटनाचा आर्थिक लाभ स्थानिक समाजापर्यंत पोहोचविणे हे शाश्वत वारसा पर्यटनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. वारसा ज्या समाजाच्या परिसरात आहे, त्या समाजाचा पर्यटन नियोजनात आणि संवर्धनात सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे.वारसा पर्यटनासमोर आव्हानेही कमी नाहीत. पर्यटकांची अनियंत्रित गर्दी, प्लास्टिक आणि इतर कचरा, भित्तींवर नावे लिहिणे, शिल्पांना स्पर्श करणे, अनधिकृत बांधकाम, ध्वनीप्रदूषण आणि वाहतुकीचा वाढता दबाव यांमुळे वारसा स्थळांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे 'अधिक पर्यटक म्हणजे अधिक पर्यटनविकास' ही संकल्पना बदलून 'जबाबदार पर्यटक, सुरक्षित वारसा आणि स्थानिकांना लाभ' या तत्त्वांना प्राधान्य द्यावे लागेल. प्रत्येक स्थळाची वहनक्षमता लक्षात घेऊन पर्यटक व्यवस्थापन करणे, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन सुधारणे, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, प्रशिक्षित मार्गदर्शक उपलब्ध करून देणे आणि संवेदनशील भागांमध्ये प्रवेशाचे नियमन करणे आवश्यक आहे. पर्यटनाच्या नावाखाली वारशाच्या मूळ स्वरूपात होणारे अनावश्यक बदल टाळणे हीदेखील महत्त्वाची जबाबदारी आहे.२०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची 'डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' ही संकल्पना महाराष्ट्रातील वारसा पर्यटनाला नवी दिशा देऊ शकते. अजिंठा आणि वेरूळच्या लेण्यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण, किल्ल्यांचे आभासी दर्शन, बहुभाषिक डिजिटल मार्गदर्शक, ध्वनिमाहिती, डिजिटल नकाशे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित माहितीसेवा यांचा वापर करता येऊ शकतो. गर्दीचे नियोजन, पर्यटकांच्या हालचालींचे विश्लेषण आणि तुलनेने कमी परिचित पर्यटनस्थळांकडे पर्यटकांचे लक्ष वळविण्यासाठीही डिजिटल साधने उपयुक्त ठरू शकतात. मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून पर्यटन काही मोजक्या प्रसिद्ध स्थळांपुरते केंद्रीत न होता त्याचा लाभ स्थानिक समुदाय आणि उदयोन्मुख पर्यटनस्थळांनाही मिळणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या २०२६ च्या संदेशात तंत्रज्ञानाने मानवाची सेवा करावी आणि पर्यटन कामगार, स्थानिक समुदाय व नव्या पर्यटनस्थळांना या बदलाच्या प्रक्रियेत सहभागी केले पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे.महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची आकर्षणे नाहीत. अजिंठ्याची चित्रकला, वेरूळचे शैलस्थापत्य, घारापुरीची शिल्पपरंपरा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची वास्तुरचना, मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तू, पश्चिम घाटाची जैवविविधता आणि मराठा मिलिटरी लँडस्केप्समधील दुर्गव्यवस्था हे महाराष्ट्राच्या विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक पैलूंचे प्रतिनिधित्व करतात. या सर्व वारसा स्थळांमधून महाराष्ट्राची ओळख देशाच्या सीमा ओलांडून जगापर्यंत पोहोचते. पर्यटनाच्या माध्यमातून विविध प्रदेशांतील आणि देशांतील लोक या वारशाशी परिचित होतात. त्यामुळे पर्यटन हे केवळ आर्थिक व्यवहार न राहता सांस्कृतिक संवादाचे आणि परस्पर समज वाढविण्याचे माध्यम बनते.जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे केवळ पर्यटक म्हणून नव्हे, तर वारशाचे संवर्धक म्हणून पाहण्याची गरज आहे. पर्यटनविकास आणि वारसा संवर्धन हे परस्परविरोधी नसून योग्य नियोजन केल्यास ते परस्परपूरक ठरू शकतात. आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्थानिक ज्ञान, वैज्ञानिक संवर्धन, पर्यावरणीय संवेदनशीलता आणि जबाबदार पर्यटन यांची सांगड घातल्यास महाराष्ट्राच्या जागतिक वारशाला अधिक व्यापक आंतरराष्ट्रीय ओळख मिळू शकते. हा वारसा कोणत्याही एका पिढीची मालमत्ता नसून अनेक पिढ्यांनी जतन केलेली मानवतेची सामूहिक संपत्ती आहे. त्यामुळे त्याचा केवळ उपभोग घेणे नव्हे, तर त्याचे संवर्धन करणे, त्यातून शिकणे आणि पुढील पिढीकडे अधिक सुरक्षित स्वरूपात सुपूर्द करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक वारशातून महाराष्ट्राच्या पर्यटनाला शाश्वत, सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक आणि स्थानिक समाजाच्या विकासाला हातभार लावणारी दिशा मिळाली, तर जागतिक पर्यटन दिनाचा संदेश खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

**सुजाता मोरे,**
**(लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)**
**sujata.more2103@gmail.com**